
अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | शुक्रवार
१८.०९.२०२६
# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आसरा
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
+91 7745067712
वर्ष: ०७ | अंक: २३० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२





## थोडक्यात

### मुंबईच्या कलाकाराची कमाल! अमेरिकेतील बाप्पासाठी बनवली अनोखी 'फोल्डेबल' गणेशमूर्ती!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – सागरी सफरीचा महिनाभराचा टप्पा पार करत मुंबईहून अमेरिकेत पोहोचलेल्या 'न्यू जर्सीच्या राजा'ची नुकतीच अत्यंत दिमाखात आणि विधिवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. गावदेवी येथील नामांकित मूर्तिकार आशिष पाटकर यांनी घडवलेली ही १४ फूट उंच, देखणी आणि अनोखी गणेशमूर्ती सध्या न्यू जर्सीतील भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे. फोल्डेबल फायबर मूर्तीचे तंत्रज्ञान परदेशात गणेशमूर्ती सुरक्षित पोहोचवणे हे मोठे आव्हान असते. यावर मात करत मूर्तिकार आशिष पाटकर यांनी अत्यंत कल्पकतेने ही मूर्ती पूर्णपणे फोल्डेबल स्वरूपात तयार केली आहे.

# १६ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचारानंतर हत्या : चौघे ताब्यात

**१६ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कारानंतर हत्या | १९ वर्षीय तरुणासह ३ अल्पवयीन ताब्यात**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***दिल्ली*** – दिल्लीतील स्वरूप नगर परिसरात १७ वर्षीय मुलीवर कथित सामूहिक अत्याचार करून चाकूने हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. १३ सप्टेंबर रोजी कुशक रोडवरील मोकळ्या मैदानात मुलीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला.



मृतदेहाची अवस्था इतकी कुजलेली होती की सुरुवातीला तो पुरुषाचा आहे की महिलेचा, हेही स्पष्ट होत नव्हते. या प्रकरणाचा तपास करताना दिल्ली पोलिसांनी ५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून संशयित टेम्पोचा माग काढला आणि चौघांना ताब्यात घेतले. घटनेचा नेमका घटनाक्रम आणि प्रत्येक संशयिताची भूमिका निश्चित करण्यासाठी पोलिसांचा तपास सुरू आहे.

कुशक रोडवरील मोकळ्या मैदानात मृतदेह १३ सप्टेंबरच्या सकाळी उत्तर-पश्चिम दिल्लीतील स्वरूप नगर परिसरातील कुशक रोडवरील लाल बॉर्डरजवळ जयपाल राणा यांच्या शेताजवळ मोकळ्या मैदानात मृतदेह पडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब झाल्याने त्याची ओळख पटवणे कठीण होते. मृतदेहाचे काही भाग भटक्या कुत्र्यांनी खाल्ल्याचेही पोलिसांनी सांगितले. तसेच एक हात शरीरापासून वेगळा झालेल्या अवस्थेत आढळल्याचे वृत्त आहे. मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या कुटुंबीयांनी दाखल केली नव्हती. ती यापूर्वीही कधीकधी घराबाहेर जाऊन काही दिवसांनी परत येत असे, अशी माहिती कुटुंबीयांनी पोलिसांना दिल्याचे सांगण्यात आले.

**टेम्पोत नेऊन अत्याचार केल्याचा आरोप**

पोलिसांच्या तपासानुसार, पीडित मुलगी आरोपींच्या परिचयाची होती. ती एका मित्राला भेटण्यासाठी बाहेर पडली होती. त्यानंतर ती आरोपींसोबत टेम्पोत गेली. टेम्पोमध्ये सर्वांनी कथितरीत्या मद्यपान केले. त्यानंतर मुलीवर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, लैंगिक अत्याचारानंतर मुलीची चाकूने हत्या करण्यात आली आणि तिचा मृतदेह मोकळ्या मैदानात टाकून देण्यात आला. तिच्या शरीरावर चाकूच्या अनेक जखमा आढळल्याचे वृत्त आहे. मात्र, घटनेचा नेमका क्रम आणि प्रत्येक आरोपीची भूमिका निश्चित करण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

**५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतून तपासाची दिशा**

या प्रकरणात सुरुवातीला कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हता. तसेच आरोपींची ओळखही स्पष्ट नव्हती. घटनास्थळी थेट सीसीटीव्ही कॅमेरा नसल्याने पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान होते. त्यानंतर परिसरातील तसेच घटनास्थळाकडे येणाऱ्या-जाणाऱ्या मार्गांवरील ५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले.

# १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांकडून वारंवार अत्याचार : रायगडमधील थरकाप उडवणारी घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – रायगडमधील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांकडून वारंवार अत्याचार केल्याचा हादरवणारा प्रकार समोर आला आहे. रायगडमधील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांकडून वारंवार अत्याचार केल्याचा हादरवणारा प्रकार समोर आला आहे. यामध्ये ५ पैकी दोन आरोपी अल्पवयीन आहेत.



रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यात एका एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांनी वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात या आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

विशेष म्हणजे, एका महिन्यापूर्वीच म्हणजे २३ ऑगस्ट रोजी देखील म्हसळा तालुक्यात एका अनुसूचित जातीच्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना घडली होती. त्यामुळे एका महिन्यात ही दुसरी घटना घडल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. पीडित मुलीच्या तक्रारीनुसार, तिच्या ओळखीच्या तरुणांनी तिला धमकावून आणि फसवून वारंवार अत्याचार केलं आहे. तसेच एप्रिल ते जून २०२६ दरम्यान, पीडितेच्या घराचे बांधकाम करणाऱ्या एका ४० वर्षीय मिस्त्रीने घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेत जबरदस्तीने घरात शिरून अत्याचार केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी म्हसळा पोलिसांनी गु.र.नं. १३१/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ६४(२)(ड), ३७६(२) आणि पोक्सो अधिनियम कलम ४, ६ अन्वये या सर्व आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या पाच आरोपींपैकी दोन आरोपी अल्पवयीन आहेत. या घटनेचा अधिक तपास म्हसळा पोलीस ठाण्याचे सपोनि चव्हाण करत आहेत.

**संभाजीनगर जिल्ह्यात वादळी वारा, वीजेचा कहर**

# दोन वेगवेगळ्या दुर्घटनेत ५ ठार, वीज पडून शेतकरी दाम्पत्याचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***छत्रपती संभाजीनगर*** – मराठवाड्यात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची खरीपाची पीके वाळून गेली आहेत. एकीकडे दुष्काळसृदश्य परिस्थिती असल्याने शेतकऱ्यांनी आता सरकारच्या निधीकडे, घोषणेकडे आस लावली आहे. आधीच पाऊस ना पाणी, पीकेही वाळून गेली. त्यातच, गुरुवारी दुपारी छ. संभाजीनगर जिल्ह्यात वीज पडून घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर चार जण गंभीर



जखमी झाले आहेत. त्यात, सिल्लोड येथील दहिगावात वीज पडून पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची मन हेलावणारी घटना घडली. जालन्यासह मराठवाड्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊसाची हजेरी पाहायला मिळाली. त्यातच, संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड तालुक्यातील दहिगाव येथे वादळी पावसादरम्यान शेतातील झोपडीत आसरा घेतलेल्या पती-पत्नीवर काळाचा घाला आला. झोपडीवर वीज कोसळल्याने पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर स्थानिकांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधत घटनेची माहिती दिली. मात्र, या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

दरम्यान, कन्नड तालुक्यातील पिशोर येथेही वीज पडण्याची दुर्घटना घडली. या घटनेत तीन महिलांचा मृत्यू झाला असून, दोन महिला आणि एक पुरुष गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. जिल्ह्यातील या दोन घटनांमुळे हळहळ व्यक्त होत असून, वादळी पावसादरम्यान नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# आरतीनंतर एरंडाच्या बिया प्रसाद म्हणून खाल्लया : १३ मुलांना विषबाधा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***छ.संभाजीनगर*** – गणेशोत्सवाच्या उत्साहात गणपतीची आरती केल्यानंतर प्रसाद म्हणून एरंडाच्या बिया खाल्लयाने १३ मुलांना विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. वैजापूर तालुक्यातील कापूस वडगाव येथे ही घटना घडली. मुलांना उलट्या आणि अस्वस्थतेचा त्रास जाणवू लागल्यानंतर त्यांना तातडीने वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या सर्व मुलांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.



गणपती बसवला, आरती केली अन प्रसादासाठी... मिळालेल्या माहितीनुसार, १७ सप्टेंबर रोजी शाळेला सुट्टी असल्याने गावातील काही मुलांनी एकत्र येत मातीची गणपतीची मूर्ती बसवली होती. त्यानंतर सर्वांनी गणपतीची आरती केली. आरती झाल्यानंतर प्रसादासाठी त्यांच्याकडे कोणताही खाद्यपदार्थ उपलब्ध नव्हता. त्यामुळे परिसरात उपलब्ध असलेल्या एरंडाच्या बिया मुलांनी प्रसाद म्हणून खाल्लया. मात्र, काही वेळातच त्यांना त्रास जाणवू लागला. एकाच वेळी अनेक मुलांना उलट्या एरंडाच्या बिया खाल्लयानंतर मुलांना उलट्या होऊ लागल्या. काही मुलांना अस्वस्थताही जाणवू लागल्याने कुटुंबीय आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने सर्व मुलांना वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी मुलांवर उपचार सुरू केले. एकाच वेळी १३ मुलांना त्रास झाल्याने वैद्यकीय यंत्रणेकडूनही आवश्यक खबरदारी घेण्यात आली.

अनोळखी बिया किंवा वनस्पती खाणे टाळण्याचे आवाहन या घटनेमुळे लहान मुलांनी परिसरात आढळणाऱ्या कोणत्याही अनोळखी बिया, फळे किंवा वनस्पतींचे भाग खाद्य आहेत की नाहीत याची माहिती नसताना खाणे किती धोकादायक ठरू शकते, हे पुन्हा समोर आले आहे.

# शिरुरमध्ये पहाटे गोळीबाराचा थरार, तरुणाचा जागीच मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – शिरूर शहरात शुक्रवारी भल्या पहाटे गोळीबाराच्या घटनेने खळबळ उडालीय. लाटेआळी आंबेडकर नगर परिसरात सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



गोळीबाराचा आवाज अन... मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हरी गंगावणे असे मृत तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास लाटेआळी परिसरात अचानक गोळीबाराचा आवाज ऐकू आला. आवाज ऐकून स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली असता हरी गंगावणे रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसून आला. गोळ्या लागल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाची पाहणी घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले.





**वरूड :** शहरातील नेत्र रोग तज्ञ डॉ.वेदांत राजोरीया व मातोश्री विनिता राजोरीया यांनी सत्यदेव नगर परिसरातील प्रसिध्द अशा बालविकास गणेश मंडळाच्या गणेश मुर्तीचे दर्शन घेतले.

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये भूगोल विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्रमुख वक्ते म्हणुन भूगोल विभाग प्रमुख डॉ.तिलकचंद धोटे तर प्रमुख अतिथी म्हणुन कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, डॉ.प्रशांत चर्जन उपस्थित होते. डॉ.अविनाश धोबे यांनी प्रास्ताविक करुन जागतिक ओझोन दिन साजरा करण्यामागील महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. प्रमुख वक्ते डॉ.तिलकचंद धोटे यांनी मानवाच्या सर्वांगीण कल्याणामध्ये पर्यावरणाचे महत्त्व प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ.रा.ना फुलारी यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून मानवाच्या समृद्धीमध्ये असलेले निसर्गाचे महत्त्व विविध उदाहरणाद्वारे पटवून सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन श्रावणी ठाकरे तर आभार समीक्षा बावणे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

गणेशोत्सव निमित्त पोलिसांचे पथसंचलन

# आगामी उत्सवाकरिता पोलिस प्रशासन सज्ज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – आगामी काळात होऊ घातलेले गणेशोत्सव व सणासुदीचे दिवस असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच संवेदनशील भागात सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी व नागरिकांमध्ये सुरक्षेतेची भावना निर्माण करण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज झाल्याचे दिसून येत आहे.

गणपती, दुर्गा, दसरा, दिवाळी, कार्तिक या उत्सवामध्ये कोणत्याही प्रकारचे विघ्न निर्माण होऊ नये तसेच पोलिस स्टेशन हद्दीत गुन्हेगारीवर अंकुश राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. जिल्हा अधिक्षक निकेतन कदम यांच्या उपस्थितीत पोलिस ठाण्यात शांतता समिती, नगराध्यक्ष, नगरसेवक, पत्रकार व शहरातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामीण भागातील पोलिस पाटील, सरपंच, उपसरपंच यांची बैठक बोलावुन पुढील नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. १६ सप्टेंबरला गणेशउत्सव २०२६ निमित्ताने शहरातील विविध भागातुन, गणपती मंडळ, विसर्जन मार्गाने उपविभागीय पोलिस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार राहुल गवई यांच्या उपस्थितीत पोलीसांचे पथसंचलन करण्यात आले.

यावेळी दंगा काबू पथक, पोलिस स्टेशनचे २ अधिकारी, १२ अंमलदार, १८ सैनिक, ३० आरसीपी अंमलदार, २४ एसआरपी जवान, १४ आरसीपी व जीआरपी जवान, बेनोडा पोलीस स्टेशनचे २ अंमलदार व ३ सैनिक उपस्थित होते. यामध्ये महिला पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी, सैनिक व जवान यांची सुद्धा उपस्थिती होती.

बालविकास  विकास गणेश मंडळातर्फे

# गणेशोत्सव निमित्ताने भाविकांना विविध कार्यक्रमांची मेजवाणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – सत्यदेव नगर येथील बालविकास गणेश मंडळातर्फे यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे.



गणेशोत्सवाची सुरुवात १४ सप्टेंबर रोजी श्री गणेश स्थापना करुन करण्यात आली. त्यानंतर १५ व १६ सप्टेंबर रोजी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. उद्या १८ सप्टेंबर रोजी मातीचे गणपती बनविण्याची स्पर्धा, १९ सप्टेंबर रोजी हरिपाठ तर २० सप्टेंबर रोजी १६ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी नृत्य व फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता आनंद बाजार, २२ रोजी सायंकाळी ७ श्याम भजन, २३ सप्टेंबर रोजी जागराता, तर २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता नंतर महाप्रसाद व छप्पन भोग वितरीत केल्या जाणार आहे. २५ सप्टेंबर रोजी श्री गणेश विसर्जनाने गणेशोत्सवाची सांगता होणार आहे.

दररोज विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसोबत गणेशभक्तांसाठी आरतीचे आयोजन सकाळी १० वाजता व सायंकाळी ७ वाजता करण्यात आले आहे. गणेशोत्सवातील सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी सहकुटूंब व मित्रपरिवारासह उपस्थित राहून उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन बाल विकास गणेश मंडळाच्या सर्व पदाधिकारी, समस्त व कार्यकर्त्यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# मंत्रालयीन पतसंस्थेत १ कोटी ६६ लाखांचा अपहार

माजी अध्यक्षांसह १० जणांवर गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – मंत्रालयातील अधिकारी –कर्मचारी सभासदांची पतसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'दि महाराष्ट्र मंत्रालय को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड' मध्ये तब्बल १ कोटी ६६ लाख रुपयांच्या आर्थिक अपहार झाल्याचे समोर आले आहे.



या प्रकरणी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, पदाधिकारी तसेच लेखापरीक्षकांसह एकूण १० जणांच्या विरोधात बुधवारी मरीन ड्राइव्ह पो–लीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०१७ ते २०२२ या पाच आर्थिक वर्षांतील संस्थेच्या आर्थिक व्यवहारांबाबत २०२३ मध्ये सहकार विभागाकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर सहकार विभागाने विशेष लेखापरीक्षक वर्ग–१ उमेश तुपे यांची फेरलेखापरीक्षणासाठी नियुक्ती केली. २८ डिसेंबर २०२३ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या फेरलेखा परीक्षणात विविध आर्थिक व्यवहारांमध्ये अनियमितता आढळल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेत

# न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलचा अजय विजेता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – युवक व क्रीडा सेवा संचालनालय, पुणे तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेत स्थानिक न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलचा विद्यार्थी अजय बानाईत याने उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरावर विजय मिळविला.



अजयच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्याध्यापक ए.बी.चौधरी, उपमुख्याध्यापक सुरेंद्र देशमुख, पर्यवेक्षक प्रमोद केने यांनी अजयचे अभिनंदन करुन पुढील विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्याच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी अजयवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

तान्हा पोळा आयोजन समितीतर्फे

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय तिवसाघाट येथे तान्हा पोळा आयोजन समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.




विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात प्रोत्साहन मिळावे तसेच त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. समितीच्या या सामाजिक उपक्रमाचे विद्यालयाच्या वतीने कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर शालेय साहित्य मिळाल्याचा आनंद दिसून आला.

कार्यक्रमातून 'विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार म्हणजेच उज्ज्वल भविष्याची पायाभरणी' हा सामाजिक संदेश देण्यात आला.


तान्हा पोळा आयोजन समितीने राबविलेल्या या उपक्रमामुळे पालक व विद्यार्थ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

# विजेच्या जिवंत तारांना वेलींनी घातला विळखा!

महावितरणचा अजब कारभार : उपाययोजना करण्याची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***हिवरखेड*** – गावातील काही भागांत वीज वितरण व्यवस्थेची धोकादायक अवस्था नागरिकांच्या निदर्शनास आली आहे. काही ठिकाणी नवीन वीजपोल बसविण्यात आले असतानाही जुने पोल अद्याप हटविण्यात आलेले नाहीत. त्याचबरोबर काही ठिकाणी जिवंत वीजवाहिन्यांना वेली व झाडाझुडपांनी वेढलेले असल्याचे दिसून येत आहे. वीज वाहिन्यांमध्ये वेली अडकणे, जुन्या पोलची संरचना कमकुवत होणे तसेच विद्युत वाहिन्यांच्या परिसरात झाडांची वाढ होणे यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो.

जोरदार वारा, पाऊस किंवा वादळाच्या वेळी वेली व झाडांच्या फांद्या वीजवाहिन्यांच्या संपर्कात आल्यास वीजपुरवठा खंडित होण्याबरोबरच शॉर्टसर्किट किंवा जीवितहानीचा धोका निर्माण होऊ शकतो.

विशेष म्हणजे नवीन पोल बसविल्यानंतरही जुने पोल तसेच ठेवले जात असल्याने विद्युत यंत्रणेच्या देखभालीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे गरजेचे आहे.

वापरात नसलेले व धोकादायक जुने पोल काढावेत, जिवंत वीजवाहिन्यांना लागलेल्या वेली व झाडांच्या फांद्या सुरक्षित पद्धतीने हटवाव्यात, वाकलेले, गंजलेले किंवा कमकुवत पोल तातडीने बदलावे, वीजवाहिन्यांची नियमित पाहणी व देखभाल करावी, पावसाळा व वादळाच्या पार्श्वभूमीवर धोकादायक ठिकाणांची विशेष तपासणी करावी, वारंवार वीजपुरवठा खंडित होणाऱ्या ठिकाणांचा तांत्रिक आढावा घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून महावितरणकडे करण्यात आली असून तातडीने पाहणी करुन उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

# संपादकीय

**अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.**

## ओला दुष्काळ : पावसाच्या अतिरेकाने उध्वस्त झालेली शेती

पाऊस हा शेतकऱ्याच्या जीवनातील आशेचा स्रोत मानला जातो. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पडणारा पाऊस शेतीला बहर देतो; मात्र तोच पाऊस: जेव्हा अतिरेक करतो, तेव्हा तो वरदान न राहता संकट ठरतो. महाराष्ट्रातील अनेक भागांत यंदा सततचा आणि मुसळधार पाऊस झाल्याने शेतजमिनी पाण्याखाली गेल्या, पिके सडली, फळबागांचे मोठे नुकसान झाले आणि शेतकऱ्यांसमोर 'ओला दुष्काळ' ही भीषण परिस्थिती उभी राहिली. नावात 'ओला' असले, तरी परिणाम मात्र कोरड्या दुष्काळाइतकाच विनाशकारी असतो. ओला दुष्काळ म्हणजे पावसाचा अभाव नव्हे, तर अति पावसामुळे शेतीचे उत्पादन नष्ट होणे. शेतात पाणी साचल्याने पिकांच्या मुळांना ऑक्सिजन मिळत नाही, रोगराई वाढते, फळे गळून पडतात आणि उभे पीक हातातून निसटते. त्यामुळे शेतकऱ्याच्या वर्षभराच्या मेहनतीवर एका आठवड्याच्या अतिवृष्टीने पाणी फिरते.

विदर्भातील अमरावती, वरुड, मोर्शी, अचलपूर, चांदूर बाजार यांसारख्या भागांत संत्रा, मोसंबी, सोयाबीन, कापूस आणि तूर ही प्रमुख पिके आहेत. संत्रा-मोसंबीच्या बागांमध्ये पाणी साचल्याने झाडांची मुळे कुजण्याचा धोका वाढला आहे. अनेक ठिकाणी फळे अकाली गळून पडली असून, सोयाबीनची शेंगा सडल्या आहेत. कापसावर बोंडअळीबरोबरच बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. शेतात यंत्रेही जाऊ शकत नसल्याने काढणीची कामे रखडली आहेत.

ओल्या दुष्काळाचा सर्वात मोठा फटका शेतकऱ्याच्या अर्थकारणाला बसतो. बी-बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि सिंचनासाठी घेतलेले कर्ज फेडण्याची वेळ येते; पण उत्पन्नच हातात येत नाही. परिणामी शेतकरी कर्जाच्या चक्रात आणखी अडकतो. ग्रामीण बाजारपेठेवरही याचा परिणाम होतो. कृषी उत्पन्न कमी झाल्याने व्यापार, वाहतूक, मजूर आणि छोट्या व्यवसायांनाही फटका बसतो.

या परिस्थितीत सरकारी मदत ही केवळ घोषणा न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे. पंचनामे वेळेत झाले पाहिजेत, पीकविमा कंपन्यांनी नुकसानभरपाई लवकर दिली पाहिजे आणि मदतीची प्रक्रिया सुलभ झाली पाहिजे. अनेकदा नुकसान मोठे असते; पण मदत अपुरी किंवा उशिराने मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण होते.

# अनागरिक धर्मपाल व पेरियार रामस्वामी

**सिंहली बेटाने असंख्य बौद्ध विद्वान निर्माण केले. त्यामुळे, सिंहली प्रदेश 'सुवर्ण लंका' म्हणुनही ओळखला जातो. या धम्मपालांपैकी दोघांची नावे बौद्ध इतिहासात प्रमुख आहेत. ६ व्या शतकातील महान विद्वान आचार्य धम्मपाल आणि १९ व्या शतकातील अनागरिक धर्मपाल (धम्मपाल). या शतकात तीन महान उपदेशक होऊन गेले. अनागरिक धर्मपाल, पेरियार रामस्वामी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर. अनागरिक धर्मपाल आणि पेरियार रामस्वामी यांची जयंती १७ सप्टेंबर या एकाच तारखेला असते. धर्मपाल यांचा जन्मदिवस १७ सप्टेंबर १८६४ सिलोन मधील मतारा या ठिकाणचा तर रामस्वामी यांचा १७ सप्टेंबर १८७९ ला दक्षिण भारतातील इरोड तामिनाडूमधील. रामस्वामींनी द्रविडांना (तमिळांना) आस्तिकवादाच्या जोखडातून मुक्त करण्याचे मोठे कार्य केले. धम्मपाल हे तमिळनाडूतील तंजावरचे होते आणि धर्मपाल हे सिलोनचे होते. आचार्य धम्मपाल यांनी पाली, बौद्ध धर्म आणि साहित्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. ते नालंदा बौद्ध विद्यापीठाचे कुलपती होते आणि एक शास्त्रज्ञ म्हणुन प्रसिद्ध होते तसेच अनागरिक धर्मपाल यांनी भारताचा लुप्त झालेला बौद्ध वारसा पुनरुज्जीवित केला आणि बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी महाबोधी सोसायटीची स्थापना केली.**

धम्मपाल तामिळनाडूतील पदरथ्य नावाच्या मठात स्थायिक झाले, जिथे त्यांनी आपल्या 'अष्टकथा' लिहिल्या. आचार्य धम्मपाल यांनी आपल्या पाली ग्रंथांसाठी प्राचीन सिंहली 'अष्टकथां'चा आधार घेतला. त्यांनी द्रविड किंवा तमिळ ऑक्टोपसचाही आधार घेतला. एकोणिसाव्या शतकात ज्या द्रविडांना आश्रय मिळाला यांपैकी एक पेरियार रामस्वामी होते.



### अनगारिक धर्मपाल यांचे बौद्ध कार्य

अनगारिक धर्मपाल यांनी १९ व्या शतकात केवळ श्रीलंकेतच नव्हे, तर भारतातही बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कार्य केले. त्यांनी हिंदूंच्या ताब्यात गेलेल्या महाबोधी महाविहाराचे पुनरुज्जीवन केले आणि नवज्योतची निर्मिती केली. त्यांनी 'महाबोधी सोसायटी ऑफ इंडिया'ची स्थापना केली आणि १९०४ मध्ये तिचे मुख्यालय कलकत्ता येथे हलवण्यात आले. बोधगया येथील महाबोधी महाविहार आणि भारतातील इतर बौद्ध स्थळे बौद्ध नियंत्रणाखाली आणणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. महाबोधी सोसायटीच्या बोधगया, सारनाथ, लखनौ, दिल्ली, मद्रास आणि इतर अनेक ठिकाणी शाखा होत्या. महाबोधी सोसायटीने १८९२ मध्ये 'महाबोधी' नावाचे एक इंग्रजी मासिक सुरू केले. अनागारिक धर्मपाल यांनी १८९३ मध्ये शिकागो येथे झालेल्या जागतिक धर्म परिषदेत एक प्रभावी भाषण दिले. त्यांनी आपल्या भाषणाचा काही भाग स्वामी विवेकानंदांना समर्पित केला.

त्यांनी कलकत्त्यात धर्मराजिका महाविहार आणि सारनाथमध्ये मूलगंध कुटी विहार यांची स्थापना केली. पाश्चात्य विद्वानांनी बौद्ध स्थळांचे उत्खनन, बौद्ध ग्रंथांवर संशोधन आणि प्रकाशन करण्यात दाखवलेल्या स्वारस्यामुळे भारतात बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन झाले. त्यांच्या कार्यामुळे त्यांना 'देवमित्र अनागारिक बोधिसत्व धर्मपाल' हे सन्मान नाव मिळाले. त्यांच्या कार्याचाच एक परिणाम म्हणजे रॉयल एशियाटिक सोसायटी. या संस्थेने प्राचीन बौद्ध धर्मावरील पुढील संशोधनास चालना दिली. एशियाटिक सोसायटीमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांमुळे धम्मावर अनेक विद्वत्तापूर्ण ग्रंथांची निर्मिती झाली.

### पेरियार ई. व्ही. रामस्वामी यांचे विचार व कार्य

पेरियार रामास्वामी यांचे कुटुंब धार्मिक आणि सनातनी होते. तथापी त्यांच्या कौटुंबिक परंपरांच्या विरुद्ध, पेरियार रामास्वामी यांनी अगदी किशोरवयापासूनच तार्किक विचार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या घरी वारंवार धार्मिक विधी आणि प्रवचने होत असत. रामास्वामी अनेकदा आपल्या तार्किक प्रश्नांनी विधी करणाऱ्यांना गुंतवून ठेवत असत. जसजसे ते मोठे होत गेले, तसतसे पेरियार आपल्या वैज्ञानिक विचारांवर अधिक ठाम झाले. परिणामी, कुटुंबाच्या अंधश्रद्धाळु आणि ढोंगी प्रथा रामास्वामींच्या निशाण्यावर येऊ लागल्या. त्यांना अनावश्यक किंवा अतार्किक वाटणारी कोणतीही प्रथा थांबवण्याचा ते नेहमी प्रयत्न करत असत. उदाहरणार्थ, स्त्रियांच्या गळ्यातील 'बली' किंवा 'हंसूली' या दागिन्याला ते बंधन आणि गुलामगिरीचे प्रतीक मानत असत. त्यामुळे, त्यांनी आपल्या पत्नीलाही तिच्या गळ्यातून 'हंसूली' काढायला लावली. ते आपल्या पत्नीला आणि कुटुंबातील इतर सदस्यांना मंदिरात जाण्याची परवानगी देत नसत. कौटुंबिक परंपरा मोडून ते अनेकदा आपल्या अस्पृश्य मित्रांना घरी बोलावून त्यांच्यासोबत जेवण करत असत. पेरियार रामास्वामींच्या धर्मविरोधी वर्तनामुळे त्यांच्या कुटुंबियांना त्रास होऊ लागला.

विवेकवाद, स्वाभिमान, समानता आणि समाजसुधारणेवर आधारित होते. १. देव आणि धर्मावरील प्रमुख विचार: देव नाही, मुळीच देव नाही, आणि जो देवाची कल्पना करतो तो मुर्ख आहे जो त्याचा उपदेश करतो तो बदमाश आहे आणि जो त्याची पूजा करतो तो रानटी आहे. तर्क आणि शहाणपण: बुद्धिमत्ता विचारात असते. विवेकवाद किंवा विज्ञानावर आधारित नसलेला कोणताही विरोध लवकरच फसवणुक, स्वार्थ आणि षडयंत्र उघडकीस आणेल. तुम्ही धार्मिक व्यक्तीकडून कोणत्याही विवेकी विचारांची अपेक्षा करू शकत नाही. देवाचे अस्तित्व स्वीकारण्यासाठी बुद्धिमत्तेची आवश्यकता नसते, परंतु नास्तिकतेसाठी मोठे धैर्य आणि दृढनिश्चय आवश्यक आहे. समानता आणि मानवता: सर्व माणसे समान आहेत. शोषण होता कामा नये. प्रत्येक मानवाला जगण्याचा आणि इतरांनाही जगू देण्याचा अधिकार आहे. आत्मसन्मान आणि वैज्ञानिक ज्ञानाशिवाय, केवळ पदव्या मिळवणे किंवा संपत्ती जमा करणे व्यर्थ आहे, जात आणि समाज: देश तेव्हाच स्वतंत्र मानला पाहिजे, जेव्हा सामान्य लोक देव, अधर्म, जात आणि अंधश्रद्धा या कल्पनांपासून पूर्णपणे मुक्त होतील. लोकांना खालच्या जातीचे ठरवण्यासाठी धर्म, देव किंवा धार्मिक ग्रंथांचा आधार घेणे हा निव्वळ मूर्खपणा आहे, असे स्पष्ट विचार त्यांचे होते.

आचार्य परंपरेनुसार, हे दोन सिंहली विद्वान त्यांच्या महान शिष्यांमुळे अमर झाले. आचार्य धर्मकीर्ती हे आचार्य धम्मपाल यांचे शिष्य होते. त्यांचे तर्कशास्त्र आणि न्यायशास्त्रावरील ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. धम्मपाल हे आचार्य वसुबंधू यांचे शिष्य होते. अनागारिक धर्मपाल यांचे शिष्य असलेले उर्गेन चंद्रमणी हे कुशीनगरमधील एक विदवान होते. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संघरक्षित यांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. बाबासाहेबांनी अशी महत्त्वपूर्ण, ऐतिहासिक धम्मक्रांती घडवून भारतात बौद्ध धर्माची सुरुवात केली तर उर्गेन संघरक्षित आचार्य परंपरा जपून आपल्या शिष्यांच्या माध्यमातून धम्माचा प्रसार करत आहेत. तामिळनाडूमध्ये पेरियार रामस्वामींना मानणारा अनुयायी वर्ग असंख्य असून तेथे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करुन सामाजिक बदल घडवून आणला जात आहे . आज भारतभर या महापुरुषांच्या जयंत्या मोठ्या प्रमाणावर साजऱ्या होतांना दिसून येते. या दोन्ही महामानवांना आजच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

**धम्मचारी डॉ.हर्षभद्र**
**(आ.भा.लोखंडे)**

# 'ज्याचं मन शुद्ध असतं, त्याला देव शोधावा लागत नाही!

**ज्याचं मन शुद्ध असतं, त्याला देव शोधावा लागत नाही; कारण देव त्याच्या मनातच वास करत असतो**

देव कुठे आहे, हा प्रश्न माणूस हजारो वर्षांपासून विचारत आला आहे. कुणी त्याला मंदिराच्या गाभाऱ्यात शोधलं, कुणी मशिदीच्या सजद्यात, कुणी चर्चच्या शांत प्रार्थनागृहात, कुणी नदीच्या प्रवाहात, कुणी पर्वतांच्या निःशब्द उंचीत, तर कुणी जंगलाच्या एकांतात. माणूस देवाच्या शोधात दूरवर गेला; परंतु कधी कधी तो आपल्या अंतर्मनाच्या दारापर्यंत पोहोचायलाच विसरला..

कारण देवाचा शोध बाहेर सुरू करण्यापूर्वी अंतर्मनात घ्यावा लागतो. ज्याचं मन निर्मळ आहे, ज्याच्या विचारांमध्ये कपट नाही, ज्याच्या शब्दांमध्ये विष नाही आणि ज्याच्या कृतींमध्ये स्वार्थापेक्षा माणुसकी मोठी आहे, त्याला देवाचा पत्ता विचारण्याची गरज नसते. त्याच्या वागण्यातच देवत्वाची झलक दिसत असते.

देव म्हणजे केवळ एखाद्या मूर्तीसमोर डोळे मिटून केलेली प्रार्थना नाही. देव म्हणजे एखाद्या दुःखी माणसाला दिलेला आधार, भुकेल्याला दिलेला घास, निराश व्यक्तीला दिलेला आशेचा शब्द आणि स्वतःकडे काही नसतानाही दुसऱ्याच्या वेदनेला दिलेली मनापासूनची साथ. मंदिरात जाणं चुकीचं नाही; उलट श्रद्धेचा तो सुंदर मार्ग आहे. पण मंदिरातून बाहेर पडल्यावर जर मनात द्वेष, अहंकार, मत्सर आणि तिरस्कार घेऊन आपण जगत असू, तर आपल्या प्रार्थनेचा अर्थ कुठेतरी हरवून जातो..

कारण देवाला फुलांचा सुगंध जितका प्रिय असेल, तितकाच निर्मळ मनाचा सुगंधही प्रिय असतो.

कधी कधी माणूस देवाला प्रसन्न करण्यासाठी मोठमोठे अभिषेक करतो, महागड्या वस्तू अर्पण करतो, उपवास करतो, तीर्थयात्रा करतो. हे सर्व श्रद्धेचे भाग असू शकतात; पण त्या श्रद्धेचा प्रकाश जर आपल्या वर्तनात उतरला नाही, तर ती श्रद्धा केवळ विधी बनून राहते. देवाच्या चरणी डोकं टेकवणं सोपं आहे; पण एखाद्या गरजू माणसासमोर अहंकार बाजूला ठेवून माणूस म्हणून उभं राहणं अधिक कठीण आहे. हात जोडणं सोपं आहे; पण चुकीच्या व्यक्तीला क्षमा करणं कठीण आहे.

मंत्र म्हणणं सोपं आहे; पण रागाच्या क्षणी संयम राखणं कठीण आहे. दान करणं सोपं आहे; पण एखाद्याच्या दुःखाची खिल्ली न उडवणं, त्याच्या कमतरतेचा फायदा न घेणं आणि त्याच्या विश्वासाचा गैरवापर न करणं हेच खरे अध्यात्म आहे..

मनाची शुद्धता म्हणजे मनात कधीही वाईट विचार न येणे नव्हे. माणूस आहे म्हणून विचार येणारच. राग येईल, मत्सर वाटेल, दुःख होईल, अहंकार डोकावेल. पण त्या विचारांना आपण आपल्या स्वभावाचा भाग बनवतो की त्यांच्यावर मात करतो, यावर आपल्या मनाची खरी शुद्धता अवलंबून असते..

निर्मळ मन म्हणजे चूक न करणारे मन नव्हे; तर चूक झाल्यावर ती स्वीकारण्याची प्रामाणिकता असलेले मन. शुद्ध मन म्हणजे कधीच दुखावले न जाणारे मन नव्हे; तर दुखावले गेल्यानंतरही द्वेषाला आपल्या आत्म्याचा मालक न बनवणारे मन. शुद्ध मन म्हणजे प्रत्येकावर अंधविश्वास ठेवणे नव्हे; तर फसवणूक झाल्यानंतरही स्वतःची माणुसकी न गमावणे. अशा मनात देवाला शोधण्याची गरज नसते. कारण तिथे देव आधीपासूनच असतो. कधी एखाद्या वृद्धाच्या डोळ्यांत तुम्हाला देव दिसतो. कधी आईच्या थरथरत्या हातात. कधी वडिलांच्या शांत त्यागात. कधी मुलाच्या निरागस हसण्यात. कधी अनोळखी व्यक्तीने केलेल्या छोट्याशा मदतीत. आणि कधी स्वतःच्या मनात उमटलेल्या करुणेच्या एका क्षणात.

देव मोठ्या चमत्कारांमध्येच असतो असे नाही.. कधी कधी तो अगदी साध्या कृतीतून प्रकटतो.. रस्त्यावर पडलेल्या माणसाला हात देताना, कुणी बोलू शकत नसताना त्याची वेदना समजून घेताना, कुणाच्या अपमानावर हसण्याऐवजी त्याच्या बाजूने उभे राहताना त्या क्षणी देव शोधावा लागत नाही; देव आपल्यातूनच व्यक्त होत असतो. माणूस बाहेरच्या जगाला बदलण्याचा प्रयत्न करत राहतो; पण अध्यात्माची खरी सुरुवात स्वतःपासून होते..

आपण जगाला दोष देतो लोक वाईट आहेत, नाती स्वार्थी आहेत, समाज भ्रष्ट आहे, माणुसकी संपली आहे. पण स्वतःच्या मनाच्या आरशात पाहण्याची वेळ आली की आपण अनेकदा नजर चुकवतो. देवाचा शोध घेण्यापूर्वी स्वतःला शोधणे गरजेचे आहे..

मनात जर अहंकाराचा गोंगाट असेल, तर मंदिरातील घंटानादही आपल्याला शांत करू शकत नाही. मनात जर द्वेषाची आग असेल, तर हजार दिवे लावूनही अंतःकरण उजळत नाही. मनात जर कपट असेल, तर कितीही पवित्र शब्द उच्चारले तरी आत्म्याला शांती मिळत नाही. पण मन निर्मळ असेल, तर साधीशी प्रार्थनाही पुरे-शी ठरते.. कधी एखाद्या शांत सकाळी सूर्यकिरण खिडकीतून आत येतो आणि मन अचानक भरून येतं. कधी मंदिरातील घंटा ऐकून डोळे मिटतात आणि मन शांत होतं. कधी निसर्गाच्या सान्निध्यात स्वतःचे अस्तित्व अगदी लहान वाटतं आणि तरीही आतून एक विलक्षण समाधान जन्माला येतं.

तोच देवाचा स्पर्श असतो.. देवाला शोधण्यासाठी नेहमी हिमालयात जाण्याची गरज नसते; कधी स्वतःच्या मनातील अहंकाराचा एक पर्वत ओलांडावा लागतो.. देवाला प्रसन्न करण्यासाठी नेहमी हजारो दिवे लावण्याची गरज नसते; कधी दुसऱ्याच्या अंधाऱ्या आयुष्यात आपण एक छोटासा दिवा बनावं लागतं. देवाला फुलं अर्पण करण्यापेक्षा आपल्या स्वभावातील काटे काढणे अधिक महत्त्वाचे असते.. कारण देवाला आपल्या हातातील वस्तूंपेक्षा आपल्या हृदयातील भावना दिसतात. आपण किती वेळा प्रार्थना केली यापेक्षा, प्रार्थनेनंतर आपण किती बदललो हे महत्त्वाचं आहे..

आपण किती मंदिरे पाहिली यापेक्षा, आपल्या मनात किती माणुसकी निर्माण झाली हे महत्त्वाचं आहे. आपण किती धार्मिक आहोत यापेक्षा, आपल्या उपस्थितीमुळे दुसऱ्या माणसाला किती सुरक्षित, सन्मानित आणि प्रेमळ वाटतं हे महत्त्वाचं आहे. कारण अध्यात्म हे कपाळावरील टिळ्यात नसतं; ते वर्तनात असतं.. ते माळेच्या मण्यांत नसतं; ते विचारांच्या निर्मळतेत असतं.

ते मोठमोठ्या प्रवचनांत नसतं; ते आपल्या छोट्या कृतींमध्ये असतं. आणि म्हणूनच ज्याचं मन शुद्ध असतं, त्याला देव शोधावा लागत नाही.. तो देवाच्या शोधात भटकत नाही; कारण देव त्याच्या स्वभावातूनच दिसत असतो. त्याच्या शब्दांत करुणा असते, नजरेत आदर असतो, कृतीत प्रामाणिकपणा असतो आणि मनात दुसऱ्यासाठी जागा असते. अशा व्यक्तीला कदाचित स्वतःला देवत्वाची जाणीवही नसते. कारण खऱ्या निर्मळतेला स्वतःच्या पवित्रतेचा अभिमान नसतो.

फुलाला सुगंध देण्यासाठी स्वतःची जाहिरात करावी लागत नाही. चंद्राला प्रकाश देण्यासाठी कुणाची परवानगी घ्यावी लागत नाही. आणि निर्मळ मनाला देव सिद्ध करण्यासाठी कोणत्याही प्रमाणपत्राची गरज नसते.

शेवटी देव कुठे आहे, याचे उत्तर कदाचित इतकेच जिथे स्वार्थापेक्षा माणुसकी मोठी आहे,
जिथे अहंकारापेक्षा प्रेम मोठं आहे,
जिथे सूडापेक्षा क्षमा मोठी आहे,
जिथे दिखाव्यापेक्षा सत्य मोठं आहे,
आणि जिथे दुसऱ्याच्या दुःखाला स्वतःच्या हृदयाची वेदना समजलं जातं तिथेच देव आहे..

**म्हणून देव शोधण्यापूर्वी मन स्वच्छ करा..**
**मनातली कटुता धुवा.**
**अहंकार खाली ठेवा.**
**द्वेषाला निरोप द्या.**
**क्षमा शिका.**
**माणुसकी जपा.**

कदाचित मग एक दिवस तुम्हाला जाणवेल ज्याचा शोध घेण्यासाठी आपण आयुष्यभर मंदिरोमंदिर भटकलो, तो देव कुठे दूर नव्हताचः तो आपल्या निर्मळ मनाच्या शांत कोपऱ्यात, सुरुवातीपासूनच निवांत बसलेला होता..

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे शांततापूर्ण आंदोलन

# समान कामासाठी समान वेतन व उच्च न्यायालयाप्रमाणे वेतनश्रेणी वाढीची मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य न्यायालय कर्मचारी महासंघाच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत बुधवारी महाराष्ट्रातील सर्व संबंधित दुय्यम न्यायालयांमधील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शांततापूर्ण व शिस्तबद्ध पद्धतीने आंदोलन केले.



'समान काम, समान वेतन' तसेच उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी वाढविणे या प्रमुख मागण्यांसाठी महासंघाने यापूर्वीच शासनाला आंदोलनाची नोटीस दिली आहे. त्याच आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणून एक दिवस काळ्या फिती लावून नियमित कामकाजावर उपस्थित राहण्याचे आंदोलन करण्यात आले.

मुंबईमध्ये या आंदोलनाला विशेषतः मोठा प्रतिसाद मिळाला. मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय, मुंबई तसेच त्यांच्या अधिपत्याखालील न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालये, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, लघुवाद न्यायालय, कुटुंब न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय येथील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले.

# मिरची मार्केटमधील शेतकऱ्यांची पिळवणुक थांबवा

## अंकुश बोडनासे यांचे नेतृत्वात वरिष्ठांना निवेदन



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – राजुरा बाजार येथील हिरवी मिरची मार्केटमध्ये शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणुक थांबवून योग्य बाजारभाव व पारदर्शक भाव प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन अंकुश बोडनासे यांचे नेतृत्वात वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, राजुरा बाजार हे हिरवी मिरचीचे मोठे बाजारपेठ म्हणुन प्रसिद्ध आहे. येथे संपुर्ण विदर्भातून शेतकरी हिरवी मिरची विक्रीसाठी आणतात.

मात्र, हिरवी मिरची विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून पिळवणुक होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.

राजुरा बाजार येथे दररोज सायंकाळी ७ वाजता हिरव्या मिरचीचा बाजारभाव अधिकृतपणे खुला करण्यात यावा, शेतकऱ्यांच्या मालाची आवक पाहून जाणीवपूर्वक भाव कमी करण्याच्या प्रकाराला आळा घालण्यात यावा, शेतकऱ्यांची पिळवणुक करणाऱ्या व्यापारी व संबंधित व्यक्तींवर कारवाई करण्यात यावी, बाजारातील दर, आवक व विक्री व्यवहारामध्ये पारदर्शकता ठेवण्यासाठी प्रशासनाने नियमित पाहणी व तपासणी करावी, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य व बाजारभावानुसार दर मिळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात.

या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करुन हिरवी मिरची उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा शेतकऱ्यांना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागेल, असा ईशारा अंकुश बोडनासे, मनिष धोटे, सुशील बेले, उमेश गणवीर, श्रीकृष्ण पाटील, अजय गाडगे, नरेंद्र गावंडे, संदीप बोहरुपी, लिकेश खंते आदींनी दिला आहे.

## साखरपुरा परिसरातील दत्तात्रय दुर्गा मंडळाच्या वतीने

# श्रावण मासानिमित्त कढई व महाप्रसादाचे आयोजन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – शनिवार पेठ साखरपुरा परिसरातील दत्तात्रय दुर्गा मंडळाच्या वतीने पवित्र श्रावण मासानिमित्त कढई कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याची परंपरा जपत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



श्रावण महिना हा भगवान शिवाच्या उपासनेसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. या पवित्र महिन्याचे औचित्य साधून दत्तात्रय दुर्गा मंडळाच्या वतीने धार्मिक वातावरणात कढईचे आयोजन करण्यात आले. सकाळपासूनच परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी श्रद्धेने सहभागी होत पूजन व धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला.

यावेळी परिसरातील महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रमाची नियोजनबद्ध तयारी करुन भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्या. धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित भाविकांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वाढण्यास मदत होते, अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. दत्तात्रय दुर्गा मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून, यंदाही श्रावण मासानिमित्त आयोजित केलेल्या या कढई कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.



**वरुड** : शहरातील प्रसिध्द रेडिऑलॉजिस्ट डॉ.आशिष लोहे यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना माजी जि.प.सभापती गिरीश कराळे, डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे, मोर्शी येथील युवा उद्योजक तथा प्रगतीशिल शेतकरी संदीप रोडे, माजी सरपंच संदीप भदाडे, डॉ.सक्षम गावंडे.



**वरुड** : शहरातील प्रसिध्द बालरोग तज्ञ डॉ.प्रविण चौधरी व स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.समता चौधरी यांनी मोठा भाजी बाजार परिसरातील प्रसिध्द अशा आनंद गणेश मंडळाच्या गणेश मुर्तीचे दर्शन घेतले.

## तपासणी, निदान अन वेळीच उपचार

# प्राथमिक ते तृतीयस्तरीय आरोग्यसेवेचे बळकटीकरण, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला 'प्रगती'चा बूस्टर

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – प्राथमिक, द्वितीय आणि तृतीयस्तरीय आरोग्य संस्थांना एकात्मिक पद्धतीने बळकटी देणे, असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध, तपासणी, लवकर निदान व उपचार, अत्याधुनिक डिजिटल आरोग्य व्यवस्था, प्रभावी संदर्भ सेवा साखळी, आरोग्य संस्थांच्या पायाभूत सुविधांचा विकास आणि नागरिकांचा आरोग्यावरील



स्वखर्च कमी करणे यासाठी प्राथमिक ते तृतीयस्तरीय आरोग्यसेवेचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पाची सुधारित किंमत ४२५० कोटी रुपये असून, त्यापैकी २९७५ कोटी रुपये एशियन डेव्हलपमेंट बँकेचे कर्ज, तर १२७५ कोटी रुपये राज्य शासनाचा निधी असणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण, तंत्रज्ञानाधारित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'प्रगती' या सर्वसमावेशक आरोग्य सुधारणा प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

# ग्रामीण रुग्णालयात रुग्णांसोबत खेळखंडोबा सुरु

## शिवसेनेची संबंधितांवर निलंबनाची कारवाही करण्याची मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील गोरगरीब जनतेला वेळेवर उपचार मिळत नसल्याने शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष अमरावतीच्या मार्फत संबंधितांवर निलंबनाची कारवाही करण्याची मागणी उपजिल्हाप्रमुख पिंटू कोरडे व जिल्हा संघटक डॉ.देविदास कावडकर यांनी केली आहे.



या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, ग्रामीण रुग्णालयात ८ सप्टेंबर रोजी इमर्जन्सी रुणाला 'आधी चिठ्ठी काढा' असे सांगुन गेटवर बेशुद्ध पडू दिले. भरती रुग्णांना औषधे नाहीत. शासकीय डॉक्टर शासकीय वेळेत पगार व एनपीए घेऊनही खाजगी दवाखान्यात प्रॅक्टिस करीत आहेत.

माझ्या मोबाईलवर कॉल रेकॉर्डिंग सायबर विभागामार्फत तपासुन धमकीची सत्यता पडताळावी, ग्रामीण व खाजगी रुग्णालयाचे दुहेरी सीसीटीव्ही, बायोमेट्रिक हजेरी, ओपीडी रजिस्टर व खाजगी पावत्यांची पडताळणी करण्यात यावी, आयएएस दर्जाच्या निःपक्षपाती अधिकाऱ्यामार्फत चौकशी करुन निलंबन, एनपीए वसुली व परवाना रद्दची कारवाई करावी, रुग्णालयात २४ तास डॉक्टर, ड्युटी चार्ट व 'आधी उपचार, नंतर चिठ्ठी' असा फलक लावावा.

या निवेदनात लक्ष्मण भलावी (२८), लक्ष्मी सोनारे (१८) व सुशीला भादे या तीन रुग्णांच्या प्रकरणांचा दाखला देण्यात आला आहे. या निवेदनावर ८ दिवसात कारवाई न झाल्यास तहसील कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषण व चक्काजाम आंदोलन छेडण्याचा ईशारा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे उपजिल्हाप्रमुख पिंटू कोरडे यांनी दिला आहे.

## शववाहन लोकार्पण सोहळ्यानिमित्त

# २६ सप्टेंबरला जिल्हास्तरीय विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – शव वाहन लोकार्पण सोहळ्यानिमित्त भव्य जिल्हास्तरीय विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २६ सप्टेंबर रोजी नागपुर रस्त्यावरील स्थानिक साई मंदिर येथे होणार आहे.




इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या वक्तृत्व स्पर्धेसाठी विविध सामाजिक विषय देण्यात आले आहेत. यामध्ये पेपरफुटीचा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम, विद्यार्थी आणि राजकारण, बेरोजगारी आणि युवकांचे भविष्य, शेतकरी आणि विद्यार्थी तसेच खाजगी शाळा की सरकारी शाळा या विषयांचा समावेश आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकासाठी ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये आणि चतुर्थ क्रमांकासाठी १ हजार ५०० रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत तसेच प्रोत्साहनपर बक्षिसेही देण्यात येणार आहेत. सर्व स्पर्धक व विजेत्यांना माँ भवानी टेन्ट्स यांचेकडून शिल्ड व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

वक्तृत्व स्पर्धेची वेळ सकाळी ११ वाजता तर शववाहन लोकार्पण सोहळा दुपारी ३ वाजता होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन सुशील बेले मित्रपरिवार, आक्रोश जनशक्ती संघटना, महिला, विद्यार्थी व युवा संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या वक्तृत्व कौशल्याला व्यासपीठ मिळवुन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ५० रुपये ठेवण्यात आले आहे.

# ऐकावं ते नवलंच ! जाहिरात फलक दिसण्यासाठी ५० झाडांची कत्तल केली

**कंपनीच्या मालकासह सहा जणांना अटक**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिकच्या गंगापूर रोडवर रात्रीच्या अंधारात दुभाजकावरील झाडांची कत्तल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जाहिरात फलक स्पष्ट दिसावा यासाठी तब्बल ५० विदेशी झाडांवर



कुऱ्हाड चालवल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत गंगापूर पोलिसांनी 'नमन्ता अॅडव्हर्टायझिंग'च्या संचालकासह सहा जणांना अटक केली आहे. सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# दार्जिलिंगमध्ये हनिमूनदरम्यान भीषण अपघात: होमस्टेमध्ये शेकोटी पेटवताना नववधू गंभीर भाजली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**दार्जिलिंग** – दार्जिलिंगच्या सुंदर टेकड्यांमध्ये हनिमूनसाठी गेलेल्या एका नवविवाहित दांपत्याच्या आनंदावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उत्तर दिनाजपूर येथील निकिता साहा आणि सौविक दास हे दोघे



लग्नानंतर फिरायला गेले होते. मात्र, सिट्टाँग येथील एका होमस्टेमध्ये शेकोटी सुरू असताना झालेल्या भीषण अपघातात नववधू निकिता अतिशय गंभीररीत्या भाजली आहे. या दुर्दैवी घटनेनंतर पती सौविक दास यांनी पोलिसांत धाव घेत होमस्टे मालक आणि निष्काळजी कर्मचाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी केली आहे. अन काही क्षणात आनंदाचे रुपांतर आगीच्या तांडवात झाले सौविक यांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ते दोघे सिट्टाँग येथील 'ऑरा होमस्टे'मध्ये पोहोचले होते. दिवसभर फिरल्यानंतर रात्री साडेआठच्या सुमारास दोघेही होमस्टेच्या आवारात शेकोटीभोवती बसले होते.

# सोमेश्वर शहाणे कलमवीर पुरस्काराने सन्मानित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी –** पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मोर्शी तालुक्यातील सोमेश्वर शहाणे यांना नुकतेच मुंबई बोरिवली येथील अटस्मृती सभागृहात प्रेस क्लब ऑफ वर्किंग जनरल लिस्ट द्वारा आयोजित कार्यक्रमातून कलमवीर सन्मान पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले.



प्रेस क्लब ऑफ वर्किंग जनरल लिस्ट राष्ट्रीय संघटक शशीदीप दीदी यांनी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या राष्ट्रीय अधिवेशन तथा सन्मान समारोह २०२६ या कार्यक्रमातून हा पुरस्कार देण्यात आला. संपूर्ण देशभरातून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पत्रकारांना विविध पुरस्कार देण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार संजय उपाध्याय मुंबई, पद्मश्री सोमा घोष, उद्योजक शंकर घनशामजी अडाणी, मुंबई पार्षद निशा परुळेकर, फिल्म इंडस्ट्री मधील मान्यवर हस्ती अरबाज अली खान, रमेश गोयल, गिरीश थापर, तथा अनेक क्षेत्रातील नामवंत उपस्थित होते.

# विश्वकर्मा पूजन दिनानिमित्त मोर्शीत भक्तिमय वातावरण

**प्रस्तावित विश्वकर्मा भवनाच्या जागेवर पूजन : समाजबांधवांची उत्स्फूर्त उपस्थिती**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – विश्वकर्मा समाजाचे आराध्य दैवत प्रभू विश्वकर्मा पूजन दिन आज प्रभू विश्वकर्मा युवा बहुउद्देशीय संघटना, मोर्शी यांच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने आयटीआय कॉलनी येथील प्रस्तावित विश्वकर्मा भवनाच्या जागेवर प्रभू विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिष्ठित नागरिक अरुणराव भिवापूरे, भागवतरावजी लोहे, लीलाधरजी मासोदकर सर



तसेच पत्रकार अजयजी पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व हारार्पणाने करण्यात आली.


यानंतर उपस्थित मान्यवर, संघटनेचे पदाधिकारी आणि समाजबांधवांनी प्रभू विश्वकर्मा यांची सामूहिक आरती केली. पूजनानंतर उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाला संघटनेचे अध्यक्ष दीपक लाडूकर, उपाध्यक्ष राजकुमारजी विश्वकर्मा, सचिव नकुल वानखडे, सहसचिव अमोल पैठणकर, कोषाध्यक्ष विवेक विश्वकर्मा यांच्यासह श्रीधर पळसकर, मयूर आकोटकर, परीक्षित शेंडे, चंदन विश्वकर्मा, विजय शेंडे, संदीप लाडूकर, सचिन कोंडुलकर, राकेश विश्वकर्मा आदी पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाला मार्गदर्शक काशिनाथ विश्वकर्मा, लिलाधर मासोदकर, शिवदास कडुकर, विलास वाघसर यांच्यासह महिला मंडळींचीही लक्षणीय उपस्थिती होती.

प्रभू विश्वकर्मा भवनाच्या प्रस्तावित जागेवर झालेल्या या पूजनामुळे समाजाच्या एकतेचे आणि आगामी सामाजिक उपक्रमांचे प्रतीकात्मक पाऊल म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले जात आहे.

# राज्यातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी!

# दहावी-बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत होणार असल्याची माहिती आहे. सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर होणार असून या तारखांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी व्यवस्थित नियोजन करता येणार आहे.

राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. इयत्ता बारावीच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एचएससी) आणि दहावीच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षांचे वेळापत्रक मंडळाने जाहीर केले आहे.




# सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे सायबर जनजागृतीसाठी 'व्हॉकथॉन'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – नागरिकांमध्ये दक्षता, पारदर्शकता, तसेच वाढत्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे 'व्हॉकथॉन' उत्साहात पार पडले.

या जनजागृती उपक्रमाचे नेतृत्व सेंट्रल बँक ऑफ इंडिया अमरावती विभागाचे विभागीय प्रमुख सुनील पांडेय यांनी केले. यावेळी उप क्षेत्रीय व्यवस्थापक प्रदीप जाधव, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक नरेश हेडाऊ, तसेच सतर्कता अधिकारी राहुल कुमार गोंड प्रमुख उपस्थित होते.

या व्हॉकथॉनमध्ये अमरावती विभागातील सर्व शाखांचे शाखा व्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. नागरिकांनी सतर्क राहून कोणत्याही प्रकारच्या सायबर फसवणुकीला बळी पडू नये, तसेच दक्ष आणि जबाबदार नागरिक म्हणून भूमिका बजावावी, असा संदेश या रॅलीद्वारे नागरिकांना देण्यात आला.

## गणेश मंडळ विशेष


**वरुड : संत्रा नगरी वरुडमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने अत्यंत उत्साहात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली.**

०१




शनिवार पेठ परिसरातील आदर्श चौकातील आदर्श गणेश मंडळाची मनमोहक मुर्ती

०३



सत्यदेव नगर परिसरातील बालविकास गणेश मंडळाची मुर्ती

०५



महात्मा फुले चौकातील परिसरातील वरुडचा राजा म्हणुन संबोधल्या जाणाऱ्या सिध्दीविनायक गणेश मंडळाची मनमोहक मुर्ती

०७



नगरपरिषद कार्यालयातील मागील परिसरातील नगर परिषद कर्मचारी गणेश मंडळाची मुर्ती

## गणेश मंडळ विशेष


**वरुड : संत्रा नगरी वरुडमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने अत्यंत उत्साहात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली.**

०२




मोठा भाजी बाजार परिसरातील आनंद गणेश मंडळाची मुर्ती

०४



ब्राम्हणपुरी परिसरातील एकता गणेश मंडळाची मुर्ती

०६




देशमुखपुरा परिसरातील श्री मंडळाची मुर्ती

०८



शिवाजी नगर परिसरातील श्री शिवाजी गणेश मंडळाची मुर्ती

# प्रवाशी वाहतुकीकरीता ऑटोचा नंबर लावण्यावरुन दोघांमध्ये वाद : दोन्ही बाजुच्या ५ जणांविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुसला** – वरुड ते पुसला आणि पुसला ते वरुड दरम्यान प्रवाशी वाहतुकीकरीता ऑटोचा नंबर लावण्यावरुन दोघांमध्ये झालेल्या वादात दोघे गंभिर जखमी झाले असून दोन्ही बाजुच्या तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी पुसला येथील एकूण ५ जणांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

फिर्यादी राहुल श्रीराव हा प्रवाशी घेवुन पांढुर्णा चौकाकडुन पुसला येथे येत असतांना आरोपी क्र.१ याने माझे नंबर असुन तु का प्रवाशी का नेत आहे, असे म्हणुन थापडा बुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ केली. आरोपी क्र.१ हा फिर्यादी राहुल श्रीराव याचे मागे पुसला येथे आला व तेथे राहुल याने त्याला म्हटले की, 'तु मला वरुड येथे का मारले?' तर त्याने फिर्यादीला थापडा बुक्क्यांनी मारहाण केली.

तेवढयात आरोपी क्र.२ हा तेथे आला व त्याने फिर्यादी राहुलला थापडा बुक्क्यांनी मारहाण केली. मारहाण सुरु असतांना फिर्यादी राहुलचा भाऊ भांडण सोडविण्याकरीता आला तर आरोपी क्र.३ याने फिर्यादी राहुलला लोखंडी पाईपने मारहाण व शिवीगाळ करुन सर्वांनी पुन्हा मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी शेंदुरजनाघाट पोलिसांनी राहुल राजु श्रीराव (३३) रा.पुसला याचे फिर्यादीवरुन आरीफ शहा रफिक शहा (४१), आसीफ शहा रफिक शहा (३७) व सोनु शहा ईस्माईल शहा (२०) तिन्ही रा.पुसला यांचे विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

यातील फिर्यादी आरीफ शहा हा ऑटोचा नंबर लावुन असतांना आरोपी क्र.१ याने गावातुन ऑटो फिरवुन प्रवाशी घेवुन पुसलाकडे जातांनी दिसला तर फिर्यादीआरीफ याने आरोपी क्र.१ याला थांबुन म्हटले की, 'माझा नंबर असतांनी तु कसा प्रवाशी घेवुन जात आहे तर आरोपी क्र.१ याने शिवीगाळ केली व तो गावाकडे निघुन गेला फियादी हा ऑटो घेवुन पुसला येथे गेला तर बस स्टॅन्ड तेथे आरोपी क्र.१ व २ हे उभे होते. त्यातील आरोपी क्र.१ याने फिर्यादी आरीफला म्हटले की, तु मला वरुड येथे शिवीगाळ करुन मारहाण का केली? तर फिर्यादी याने म्हटले की, मी तुला मारहाण केली नाही तर आरोपी क्र.१ याने थापडा बुक्क्यांनी मारहाण केली. यात फिर्यादी आसीफ जखमी झाला व आरोपी क्र.२ याने सुध्दा त्यास मारहाण केली. या हाणामारीत फिर्यादी खाली पडला व भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीचा भाऊ आसीफ व सोनु यांनी भांडण सोडुन फिर्यादी आरीफला त्याचे ताब्यातुन सोडले व आरोपी याने पुन्हा मारण्याची धमकी दिली. यावरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी राहुल राजु श्रीराव (३३), प्रतिक राजु श्रीराव (३०) रा.पुसला याचे विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी

# शहरात पोलिसांचे पथसंचलन व रंगीत तालीम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वरुड शहरात पोलिसांच्या वतीने पथसंचलन करण्यात आले. सकाळी १०.४५ ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत हा रुट मार्च घेण्यात आला.

यावेळी मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या उपस्थितीत पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शहरातील मिश्र वस्ती तसेच गणेश विसर्जन मार्गाची पाहणी केली. रूट मार्चदरम्यान विसर्जन मार्गावरील विविध धार्मिक स्थळे, संवेदनशील ठिकाणे आणि परिसराची माहिती सहभागी अधिकारी व अंमलदारांना देण्यात आली. गणेशोत्सव व विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पोलिस यंत्रणेने विशेष खबरदारी घेतली.

यानंतर नगरपरिषद मराठी शाळेच्या मैदानावर दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत जमावावर नियंत्रण मिळिवणे, परिस्थिती हाताळणे आणि कायदा–सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा सराव यावेळी करण्यात आला.

या रुट मार्च व दंगा काबू योजनेच्या रंगीत तालीममध्ये पोलीस ठाण्याचे ६ अधिकारी, २५ अंमलदार, २८ सैनिक ग्रुपचे ४ अंमलदार, आरसीपीचे १० अंमलदार, नाशिक प्रशिक्षण केंद्रातील २ पीएसआय, एसआरपीएफची एक प्लाटून, पोलीस स्टेशन बेनोडा येथील २ अंमलदार व ७ सैनिक, तसेच शेंदूरजना घाट पोलीस ठाण्यातील ८ अंमलदार व २ सैनिक सहभागी झाले होते.

गणेशोत्सव काळात नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पथसंचलन प्रसंगी ठाणेदार अशोक जाधव यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरिक्षक राहुल जाधव, निलेश गोपालचावडीकर, गोपीनाथ वाघमारे, पोलिस उपनिरिक्षक सिध्दार्थ उमाळे, प्रविण कराड, मोनिका मांदळे, श्रीकांत विखे आदी अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

एकच शेतजमीन अनेकांना विकली

# ३५ जणांना ११.८५ कोटींचा गंडा, नांदेडमध्ये तिघांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नांदेड** – बनावट जमीन कागदपत्रे तयार करून एकच शेतजमीन अनेक व्यक्तींना वारंवार विकल्याच्या आरोपावरून नांदेड शहर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. या आरोपींनी किमान ३५ जणांची तब्बल ११ कोटी ८५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे पोलिसांनी सांगितले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे राहुल नागोराव गायकवाड (३८), जखाजी ऊर्फ बंडू धोंडिजी पावडे (४३) आणि अमोल अशोकराव मालेगावकर (४२) अशी आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, गायकवाड याने यावर्षी जानेवारीमध्ये तक्रारदार देवेंद्र शर्मा यांच्याशी मैत्री केली. त्यानंतर अर्धापूर तालुक्यातील मेंढला खुर्द येथील एका शेतजमिनीच्या मालकीचा दावा करणारी बनावट कागदपत्रे त्यांना दाखवली. त्यानंतर या जमिनीची शर्मांना विक्री करण्याचा व्यवहार ठरवून त्यांच्याकडून ३५ लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे.

# दापोरीच्या कोंबडी चोरी प्रकरणी तालुक्यातील दोघे अटकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाही : एकाचा शोध सुरु



**वरुड** – मोर्शी तालुक्यातील दापोरी येथील पोल्ट्री फार्म येथून कोंबड्या चोरी प्रकरणी वरुड तालुक्यातील दोघांना स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले असून एक आरोपी फरार झाला आहे.

दापोरी येथील अशोक फकीर चौधरी यांच्या तक्रारीवरुन मोर्शी पोलिसांनी कलम ३०५,३३४ (१) भा.न्या.स.प्रमाणे पोल्ट्री फार्म येथून कोंबड्या चोरीचा अज्ञात इसमांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण हे करत असताना १५ सप्टेंबर रोजी सदर तांत्रिक व गोपनीय माहीतीच्या आधारे तपास करुन सदर गुन्हयातील आरोपी श्याम वासुदेवराव सुरजुसे (२८) रा. सुरळी व मुकेश दिवाकर धुर्वे (२४) रा.कारली ता.वरुड अशा दोन आरोपींना अटक करुन नगदी ९ हजार १०० रुपये व गुन्हयात वापरलेली मोटारसायकल किंमत अंदाजे ४० हजार रुपये असा एकूण ४९ हजार १००रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन पो.स्टे. मोर्शी यांच्या ताब्यात देण्यात आला असून सदर गुन्हयातील फरार आरोपी नामे विजय ज्ञानेश्वर उईके रा.सुरळी याचा शोध घेणे सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम (भापोसे) यांच्या आदेशाने अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अशोक लांडे, स्थानिक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात सहायक पोलिस उपनिरिक्षक राजपूत, आकाश शिवणकर, अंमलदार रुपेश गावंडे, विवेक घोरमाडे, शांताराम सोनोने, प्रशांत वैद्य, श्याम गावंडे, रविंद्र वऱ्हाडे, शिवा शिरसाट, चालक प्रज्वल राऊत यांचे पथकाने केली आहे.

# ७६ दिवे प्रज्वलित करुन मोदींचा वाढदिवस साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

बालविकास गणेश मंडळात सभापती विनय खासबागे यांची उपस्थिती



**वरुड** – शहरातील सत्यदेव नगर येथील बालविकास गणेश मंडळाच्या वतीने देशाचे कर्तव्यदक्ष, यशस्वी आणि निर्भयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच लहान–मोठ्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मंडळाच्या वतीने ७६ दिवे प्रज्वलित करून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. यावेळी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आला.

या कार्यक्रमाला विनय नगरसेवक तथा न.प.आरोग्य समिति सभापती विनय खासबागे, अग्रवाल कुटुंबातील सदस्य, वाडबुदे परिवार, रत्नपारखी परिवार, खंडेलवाल परिवार तसेच परिसरातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त आयोजित लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत नागरिकांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उदंड आयुष्याची व उत्तम आरोग्याची प्रार्थना केली. देशाच्या विकासासाठी आणि जनसेवेसाठी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमामुळे सत्यदेव नगर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाल विकास गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. लहान–मोठ्या कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

